"ना हरकत परवाना /पोलीस परवानाबाबत
मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम
३३ अंतर्गत विनंती अर्ज.

महाराष्ट्र शासन,

गृहविभाग [विशेष]

क्रमांक आरईअच ०१८५/वि.शा. ५,

मंत्रालय, मुंबई -३२ बी आर. दिनांक २८ जानेवारी १९८५.

प रि प त्रक क

शासनाच्या असे दृष्टोत्पतीस आले आहे की, नवीन हॉटेल/ गेस्ट हाऊस/ करमणूक केंद्र [ Amusement Parlour ] इत्यादी सुरु करण्यासाठी अनुज्ञप्ती प्राधिका-यांकडे विनंत्या अर्ज ब-याच कालावधीसाठी प्रलंबित आहेत. कांही प्रकरणी असे अर्ज तीन / चार वर्षे प्रलंबित असल्याचे दिसले. अशा वास्तूसाठी ब-याच भांडवलाची गुंतवणूक करणे आवश्यक असते व त्यामुळे अर्जदारांना आर्थिक नुकसान होत असते. शासकीय धोरणानुसार प्रत्येक विनंती अर्जाचा त्वरित निपटारा होणे अत्यंत जरुरीचे आहे. वरील परिस्थिती लक्षांत घेऊन शासन असे आदेश देते की, अशा विनंत्या अनुज्ञप्ती प्राधिका-यांना प्राप्त झाल्यापासून त्यांनी आपला अंतिम निर्णय दोन महिन्याच्या कालावधीत [ साठ दिवस ] देणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. जर अशा अर्जावर दोन महिन्याच्या कालावधीत आपला निर्णय दिला नाही तर व जर अशी गोष्ट शासनाच्या दृष्टोत्पतीस आली तर ज्या व्यक्तीकडून दिरंगाई झाली आहे त्यांचेविरुद्द योग्य ती कार्यवाही केली जाईल.

तरी सर्व अनुज्ञप्ती प्राधिका-यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वर नमूद केलेल्या विहित कालावधीत त्यांच्याकडे येणारे वरील विषयाबाबतचे सर्व विनंती अर्ज निकालात ~~काढाव~~ काढावेत.

जिल्हाधिकारी रत्नागिरी
—कार्यालय—
2 FEB 1985

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ अ. ज. कर्णिक. ]
कार्यासन अधिकारी, गृहविभाग [विशेष] महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई/ पुणे/ नागपूर / ठाणे,
सर्व जिल्हादंडाधिकारी.

क्रमांक. डिसी. पीओएल/८५.३५४
जिल्हा दंडाधिकारी कार्यालय
रत्नागिरी. दिनांक ४/२/८५

प्रतिलिपी उपविभागीय दंडाधिकारी, दापोली, चिपळूण व रत्नागिरी
यांचेकडे (सर्व) व कार्यकारी दंडाधिकारी (सर्व) यांचेकडे माहितीसाठी